






# महाराष्ट्र शासन

# अर्थसंकल्प : २०१६-१७

# नगर विकास विभाग

समर्थन

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**
११५- समर्थन, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई स्थानकासमोर,
वसई (पू), पालघर -४०१ २०८ ☎ ०२५०-२३९०१०३/४
Email: samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **श्री. सुशील शुक्ल**



संपादन :
**मुक्ता भारती**

संकलन:
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७
**मॅकेन्झी डाबरे** - ९२७१७१४२८४

मांडणी व अक्षरजुळणी :
**प्रतिक्षा कोयंडे**
**सोनल सहस्त्रबुद्धे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई १५६७/९६ जीबीबीएसडी



**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
समर्थन – ११५- धुरी कॉमर्स प्लाझा,
वसई रोड रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), जि. पालघर -४०१ २०८
दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


## लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे ‘समर्थन’

### समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### ‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# पुस्तिका वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- ‘समर्थन’ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती पुस्तिकेचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. ही पुस्तिका माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २००८-०९ पासून २०१६-१७ पर्यंत अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्च आणि तरतूद समाविष्ट केली आहे.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.

- विवेक पंडित

संस्थापक, समर्थन

९८२३१४७००३

pvivek2308@gmail.com

# नगर विकास विभाग

**प्रस्तावना :**

संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्य हे नागरीकरण क्षेत्रात आघाडीवर आहे.सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील ४५% इतकी लोकसंख्या नागरी भागात वास्तव्य करते. हे प्रमाण देशातील इतर राज्यांपेक्षा सर्वात अधिक आहे. महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११.२३ कोटी असून नागरी क्षेत्रातील लोकसंख्या ५.०८ कोटी आहे. ही नागरी लोकसंख्या बहुतांशी करुन पुणे, मुंबई, नागपूर अशा महानगरीय क्षेत्रात केंद्रीत झालेली दिसून येते. राज्यात ३६ जिल्हे असून प्रशासकीय सुविधेसाठी ते कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या ६ महसुली विभागात विभागले आहेत. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी तसेच देशाची आर्थिक राजधानी असून बहुतांशी प्रमुख प्रमुख खाजगी कंपन्या व वित्तीय संस्थांची मुख्यालये या शहरात आहेत. देशातील प्रमुख वायदे व भांडवली बाजार आणि विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्रे मुंबईत आहेत.या शिवाय राज्यात सध्या खालील विशेष नियोजन प्राधिकरणे अस्तित्वात आहेत:-

१. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

२. शहर व औद्योगिक विकास महामंडळ

३. नागपूर सुधार प्रन्यास

४. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

५. तूळजापूर शहर विकास प्राधिकरण

६. पैठण आपेगांव शहर विकास प्राधिकरण

७. पंढरपूर शहर विकास प्राधिकरण

## कृषी की उद्योग, प्राधान्यक्रम ठरविण्यात सरकार अपयशी

शहरीकरण झापाट्याने वाढत असताना शहरातील नागरी सेवांचा बोजवारा उडतोय.महाराष्ट्र सहकार चळवळीचा जनक. कृषी क्रांतीद्वारे ग्रामीण भागाच्या विकासात चालना देणारे शासन धोरण बदलत आहे. १९६०-१९६१ मध्ये ७१.८८ % जनता ग्रामीण भागात वसलेली होती. तर २८.२२% जनता शहरी व निमशहरी भागात वसलेली होती. मागील ५० वर्षात यामध्ये मोठा फरक पडून जवळजवळ दुपटीने म्हणजेच ४५.२% जनता शहरी भागात वसलेली आहे. कधीकाळी कृषी हे मुख्य उत्पन्नाच साधन होते. आज ''उद्योग व सेवा'' क्षेत्र उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत बनलेले आहे.

# कृषीप्रधानतेतून उद्योग व सेवाक्षेत्राकडे

तक्ता क्र. १

| जनगणनेनुसार लोकसंख्या ( हजारात) | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | २०११ |
| एकूण | ३९,५५४ | ५०,४१२ | ६२,७८४ | ७८,९३७ | ९६,८७९ | १,१२,३७४ | १,१२,३७४ |
| पुरुष | २०,४२९ | २६,११६ | ३२,४१५ | ४०,८२६ | ५०,४०१ | ५८,२४३ | ५८,२४३ |
| स्त्रिया | १९,१२५ | २४,२९६ | ३०,३६९ | ३८,१११ | ४६,४७८ | ५४,१३१ | ५४,१३१ |
| ग्रामीण | २८,३९१ | ३४,७०१ | ४०,७९१ | ४८,३९५ | ५५,७७८ | ६१,५५६ | ६१,५५६ |
| नागरी | ११,१६३ | १५,७११ | २१,९९३ | ३०,५४२ | ४१,१०१ | ५०,८१८ | ५०,८१८ |
| अनुसूचित जाती | २,२२७ | ३,१७७ | ४,४८० | ८,७५८ | ९,८८२ | १३,२७६ | १३,२७६ |
| अनुसूचित जमाती | २,३९७ | ३,८४१ | ५,७७२ | ७,३१८ | ८,५७७ | १०,५१० | १०,५१० |
| लोकसंख्येची घनता ( प्रती चौ.कि.मी) | १२९ | १६४ | २०४ | २५७ | ३१५ | ३६५ | ३६५ |
| साक्षरतेचे प्रमाण ( %) | ३५.१ | ४५.८ | ५७.१ | ६४.९ | ७६.९ | ८२.३ | ८२.३ |
| स्त्री-पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रती हजार पुरुष) | ९३६ | ९३० | ९३७ | ९३४ | ९२२ | ९२९ | ९२९ |
| नागरी लोकसंख्येचे प्रमाण (%) | २८.२२ | ३१.१७ | ३५.०३ | ३८.६९ | ४२.४३ | ४५.२ | ४५.२ |
| **राज्य उत्पन्न - (चालू किंमतीनुसार)** | | | | | | | |
| राज्य उत्पन्न (रुपये कोटी) | २,२४९ | ५,७८० | १९,३७७ | ६८,८६१ | २,४३,५८४ | ९,५०,७७१ | १५,७२,०३७++ |
| कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र ( रुपये कोटी ) | ५८५ | १,०७८ | ३ ,७५६ | १२,३२६ | ३२,७११ | १,२२,९३२ | १,५७,४७७++ |
| उद्योग क्षेत्र (रुपये कोटी) | ५५३ | १,७३२ | ६,२२४ | २२,५५४ | ६४,९४२ | २,६३,५१२ | ४,४८,०७७++ |
| सेवा क्षेत्र ( रुपये कोटी) | १,१११ | २ ,९६९ | ९,३९७ | ३३,९८१ | १,४५,९३१ | ५,६४,३२६ | ७,५२,७०८++ |
| दरडोई राज्य उत्पन्न (रुपये) | ५७६ | १ ,१६८ | ३,११२ | ८,८११ | २८ ,५४० | ८४ ,८५८ | १ ,३४ ,०८१+ |

++ मूळ किंमतीनुसार अंदाज, + बाजार किंमतीनुसार अंदाज , + पहिले सुधारित अंदाज ( पायाभूत वर्ष २०११-१२)

*(स्त्रोत: कार्यक्रम अंदाजपत्रक २०१६-१७)*

# श्रीमंती मुलींच्या मुळावर

**श्रीमंत मुंबई स्त्री जन्मदरात मात्र राज्यात सर्वाधिक गरीब:**

स्त्री-पुरुष प्रमाण मुंबई-८३२,मुंबई उपनगर ८६० तर ठाणे ८८६ आहे. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत हे प्रमाण कमी असून एकूण महाराष्ट्रातील स्त्री-पुरुष प्रमाण ९२९ आहे.

**जिल्हानिहाय लोकसंख्याविषयक निर्देशक जनगणना, २०११**

तक्ता क्र.२

| अक्र. | जिल्हा | लोकसंख्या (०००) | | | दशवर्षिक वृध्दिदर% (२००१-११) | स्त्री-पुरुष प्रमाण | बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण (०-६ वर्षे वयोगट) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण | | | |
| १ | मुंबई शहर | १,६८५ | १,४०१ | ३,०८५ | - ७.६ | ८३२ | ९१४ |
| २ | मुंबई उपनगर | ५,०३१ | ४,३२६ | ९,३५७ | ८.३ | ८६० | ९१३ |
| ३ | ठाणे | ५,८६५ | ५,१९५ | ११,०६० | ३६.० | ८८६ | ९२४ |
| ४ | नाशिक | ३,१५७ | २,९५० | ६,१०७ | २२.३ | ९३४ | ८९० |
| ५ | पुणे | ४,९२४ | ४,५०५ | ९,४२९ | ३०.४ | ९१५ | ८८३ |
| ६ | औरंगाबाद | १,९२४ | १,७७७ | ३,७०१ | २७.८ | ९२३ | ८५८ |
| ७ | नागपूर | २,३८५ | २,२६९ | ४,६५४ | १४.४ | ९५१ | ९३१ |

*आधार: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१५*

# झगमगत्या शहरांतील खरे वास्तव

महाराष्ट्राचे नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढत असताना गरीब व श्रीमंत यामधील दरी दिवसेंदिवस वाढत आहे. राज्याचे आर्थिक सर्वेक्षण स्पष्टपणे राज्याची सरासरी, शहरी भागांतील जिल्हे व ग्रामीण जिल्हे या दरम्यानच्या दरडोई उत्पन्नातील तफावत दर्शविते. जर आपण हिंगोली (रुपये ५३,७५०) , नंदूरबार (रुपये ५६,५२१) आणि गडचिरोली (रुपये ५८,६०३) यासारख्या ग्रामीण प्रतिनिधीत्व असणाऱ्या जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नाची तुलना केली तर आपणास असे दिसून येते की, पुणे (रुपये १,७१,६३६), ठाणे ( रुपये १,७३,१५०) व मुंबईचे ( रुपये १,८८,७३९) आहे. तर राज्याचे दरडोई उत्पन्न हे (रुपये १,२५,१४६) इतके आहे. यांचे दरडोई उत्पन्न हे नंदूरबार व गडचिरोलीच्या दरडोई उत्पन्नाच्या जवळपास तिप्पट आहे. मुंबई-ठाणे-पुणे व गडचिरोली- नंदूरबार यांच्या दरडोई उत्पन्नातील तफावत साधारणत: रुपये १,३०, ००० इतके भरते. तर राज्याच्या सरासरीची तफावत साधारणत: रुपये ७०,००० इतकी भरते.

राज्यातील मोठ्या शहरात ३० ते ४०% जनता झोपडपट्टीत राहते. वीज,पाणी,घर यासारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. असंघटित क्षेत्रात रोजंदारीवर जगणारे श्रमीकांना दोन वेळच्या जेवणाची भ्रांत आहे. सदैव्य असुरक्षित असणारे शहरी गरीब आपल्या अधिकारापासून वंचित आहेत.

# राज्याच्या दरडोई जिल्हा उत्पन्नाबाबत विषमतेची प्रचंड दरी

आलेख क्र.१




*(स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी वर्ष २०१५-१६)*

- मुंबई जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न राज्यात सर्वात अधिक असून ते हिंगोली सारख्या भागात जिल्ह्याच्या तिपटी पेक्षा जास्त आहे. हिंगोली, नंदूरबार, गडचिरोली हे ग्रामीण जिल्हे आहेत तर मुंबई, पुणे, ठाणे विकसित शहरी जिल्हे आहेत.

- उद्योग क्षेत्र, सेवा क्षेत्र तसेच कृषी क्षेत्राचा वाटा देखील हिंगोली, नंदूरबार व गडचिरोली जिल्ह्यात राज्याच्या इतर जिल्ह्यांशी तुलना करता नगण्य आहे.

# मोठ्या महानगराभोवती केंद्रीत नगरविकास विभाग

संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्य हे नागरीकरण क्षेत्रात आघाडीवर आहे.सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील ४५% इतकी म्हणजे ५.०८ कोटी लोकसंख्या नागरी भागात वास्तव्य करते. राज्यात सध्या २६ महानगरपालिका व ३३३ नगरपरिषदा व नगरपंचायती आहेत. ही नागरी लोकसंख्या बहुतांशी करुन पुणे, मुंबई, नागपूर अशा महानगरीय क्षेत्रात केंद्रीत झालेली दिसून येते.

## नगर विकास विभागाचा अर्थसंकल्प

आलेख क्र. २ (रु. कोटीत)




| | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | २२८६ | ४२०१ | ५६५५ | ६१७० | ६५१६ | ६०३६ | ६९७१ | १७७६२ |
| सुधारित अंदाज | ५८१८ | ४८८५ | ५४१३ | ६०४३ | ६५३६ | ७८९४ | ११७४७ | |
| प्रत्यक्ष खर्च | ५५९४ | ४१६० | ४८१५ | ४५९४ | ५५८६ | ६१८७ | | |

*(स्त्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, खर्चाचा प्रधानशिर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा)*
*(टीप: वर्ष २०१५-१६चे सुधारित अंदाज व वर्ष २०१६-१७ चे अर्थसंकल्पीय अंदाज*

- **२०१५-१६ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. ६ हजार ९७१ कोटी होता. २०१५-१६ मध्ये त्या तुलनेत सुधारित अंदाज रुपये ४ हजार ७७६ कोटीने वाढून रुपये ११ हजार ७४७ झाले.**
- **२०१५-१६ मध्ये सुधारीत अंदाज रु. ११ हजार ७४७ होता. २०१६-१७ मध्ये त्या तुलनेत अर्थसंकल्पीय अंदाज रुपये ६ हजार १५ कोटीने वाढून रुपये १७हजार ७६२ कोटी इतका झाले.**
- **२०१५-१६ अर्थसंकल्पीय अंदाज व २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाजातील तफावत रुपये १०हजार ७९१ कोटी इतकी आहे म्हणजेच जवळजवळ ३ पटीने जास्त.**
- **२०१४-१५ मध्ये सुधारीत अंदाज रुपये ७ हजार ८९४ कोटी होता प्रत्यक्ष खर्च रुपये १ हजार ७०७ कोटी कमी होऊन रुपये ६ हजार १८७ इतका झाला.**

# नगर विकास विभागाचा योजनेतर व योजनांतर्गत खर्च

आलेख क्र. ३ (रु. कोटीत)




| | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| योजनेतर | १७२७ | १६४३ | २१२४ | २४१९ | २४०८ | ३७११ | ७४३९ | १११२२ |
| योजनांतर्गत | ३८६६ | २५१६ | २६९१ | २१७४ | ३१७७ | २४७५ | ४३०७ | ६६३९ |

*(स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, खर्चाचा प्रधानशिर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा)*

*(टीप: वर्ष २०१५-१६चे सुधारित अंदाज व वर्ष २०१६-१७ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **२०१५-१६ मध्ये योजनेतर खर्च रुपये ७ हजार ४३९ कोटी इतका अंदाजित होता. २०१६-१७ त्यामध्ये रुपये ३ हजार ६८३ कोटीने वाढ घेऊन रुपये ११ हजार १२२ कोटी इतका अंदाजित आहे.**
- **२०१५-१६ मध्ये योजनांतर्गत खर्च रुपये ४ हजार ३०७ इतका अंदाजित होता. २०१६-१७ मध्ये यामध्ये रुपये २ हजार ३३२ कोटी वाढ होऊन रुपये ६ हजार ६३९ कोटी इतका अंदाजित आहे.**
- **अर्थसंकल्पीय योजनांतर्गत खर्चात जवळजवळ रुपये २ हजार ५८८ कोटी केंद्र शासनाचा हिस्सा आहे. राज्य शासनाचा हिस्सा रुपये ४ हजार ५१ कोटी आहे.**
- **योजनेतर खर्चात वाढ होण्याचे मोठे कारण LBT व टोलमाफी रद्द सारखे निर्णय शासनाने घेतल्याने मोठ्या प्रमाणात नुकसानभरपाई देण्यासाठी रुपये ८ हजार २६० कोटी खर्च अपेक्षित आहे.**

# करभरणा न करणाऱ्यालाच कर सवलत

**शासनाचे अजब धोरण:**

शासनाने दिनांक १ ऑगस्ट २०१५ पासून रु. ५०.०० कोटीपेक्षा कमी आर्थिक उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर भरण्यापासून सूट देण्याचा निर्णय घेतला आहे व त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. यामुळे महानगरपालिकांच्या उत्पन्नामध्ये येणारी तूट भरून काढण्यासाठी शासनाकडून सहाय्यक अनुदान देण्यात येते.

सन २०१५-१६ साठी शासनाने पूरक मागणीद्वारे रु. ३ हजार ३२८ कोटी ३२ लाखांची तरतूद केली आहे. तर २०१६-१७ साठी विभागाने स्थानिक संस्था अनुदानासाठी रुपये ८ हजार २६० कोटी ७४ लाखांची तरतूद प्रस्तावित केली आहे. तर १% अतिरिक्त मुद्रांक शुल्कासाठी रुपये १ हजार कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे.

## राज्य शासनाने रु.६२ हजार ९०७ कोटी ९१ लाखाच्या महसूलावर सोडले पाणी

### निर्विवाद रकमांची वसुली विवादास्पद!

*तक्ता क्र. ३* *( रु.कोटीत)*

| तपशील | वर्ष २०१३-१४ | वर्ष २०१४-१५ | वाढ | वाढीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| कर महसुलातील वसूल न केलेल्या विवादास्पद रकमा | २४४६५.१८ | ३४४९०.५५ | १००२५.३७ | २९.०६ |
| कर महसुलातील वसूल न केलेल्या निर्विवाद रकमा | २४२०२.७५ | २५२२४.९२ | १०२२.१७ | ४.०५ |
| वसूल न केलेला करेतर महसूल | २९७५.७० | ३१९२.४४ | २१६.७४ | ६.७८ |
| **एकूण** | **५१६४३.६३** | **६२९०७.९१** | **११२६४.२८** | **१७.९०** |

*(स्त्रोत: मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, २०१६-१७)*

- **एकीकडे LBT / टोल मध्ये सूट व दुसरीकडे याच उद्योगांकडून महसूल येत नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी व मदत देण्यात हात आखडता घेणारे शासन व्यापारी उद्योगपतींवर सढळ हस्ते खुशी-खुशीने मदत करीत आहे.**

# राज्यात ३० लाख तरुण बेरोजगार

शासन राज्यामध्ये 'मेक इन इंडिया' कार्यक्रमादरम्यान रुपये ७,९४,०५७ कोटी प्रस्तावित गुंतवणूक व ३०.९ लाख अपेक्षित रोजगारासह २,५९४ सामंजस्य करार करण्यात आल्याचे म्हणजे आले मात्र ऑगस्ट १९९१ ते ऑक्टोबर २०१५ या कालावधीत राज्यात रुपये १०,९७,३३७ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीच्या १९,०५३ औद्योगिक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्यापैकी रुपये २,६२,६३१ कोटी ( २३.९%) प्रस्तावित गुंतवणूकीचे ८,४९७ प्रकल्प (४४.६%) कार्यान्वित झाले. राज्यात सप्टेंबर २०१५ अखेर रुपये ५६,५५२ कोटी गुंतवणूकीचे व २९.२ लाख रोजगार असलेले सुमारे २.४४ लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम कार्यरत होते. सहाव्या आर्थिक गणनेनुसार राज्यात ६१.३ लाख आस्थापना असून ज्यामधील रोजगार १४५.१ लाख आहे. राज्यात आजही ३० लाख तरुण बेरोजगार व नोकरीच्या शोधात आहेत.

## सामंजस्य कराराच्या ४०% प्रकल्प कार्यान्वित नाहीत

### उद्योग गटनिहाय मंजूर प्रस्ताव व कार्यान्वित प्रकल्प

तक्ता क्र. ४ (ऑगस्ट १९९१ ते ऑक्टोबर २०१५)

| उद्योग गट | मंजूर प्रस्ताव | | कार्यान्वित प्रकल्प | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | गुंतवणूक ( रुपये कोटी) | संख्या | गुंतवणूक ( रुपये कोटी) |
| माहिती व तंत्रज्ञान | ४५३ | ३,८६,७११ | २४३ | ५४,२५१ |
| इंधन | ८१५ | १,४२,८३९ | १९५ | २८,०२५ |
| धातू | १,९०९ | १,००,९९७ | ९३५ | ३६,७०९ |
| रसायने व खते | २,८३९ | ५९,९०१ | १,३८६ | २२,२४८ |
| वस्त्रोद्योग | १,९९८ | ४९,९८१ | ९३३ | १६,९३९ |
| साखर | १,५३२ | ३८,४२४ | २३५ | ८,४०२ |
| परिवहन | ४२१ | ३२,१४९ | २८५ | २४,५५४ |
| फोटोग्राफी फिल्म्स व कागद | ९८१ | २८,४१९ | ५७० | १३,९९८ |
| सिमेंट जिप्सम | ३६८ | २४,५७८ | १४८ | ५,५९७ |
| औद्योगिक यंत्रसामग्री | ८५१ | २४,२०४ | ५०९ | ८,८०२ |
| विद्युत आणि इलेक्ट्रॉनिक्स | १,१७४ | २२,४२९ | ६८३ | ७,८१४ |
| प्रक्रिया केलेले अन्न | १,०४६ | २०,२५२ | ४४० | ५,७८२ |
| वनस्पती तेल आणि वनस्पती | ३७३ | १६,०९१ | २०३ | २,३३२ |
| औषधी | ८५४ | १६,०२८ | ४९६ | ४,३४१ |
| कागद व कागद उत्पादने | ५३८ | १५,८२६ | २७१ | ७,५८६ |
| अभियांत्रिकी | ३४४ | १२,३६७ | १९३ | ४,१४४ |
| यंत्रसामग्री/सिरॅमिक/संकीर्ण उद्योग | ४५७ | ७,९६१ | २८२ | ४,१६१ |
| **इतर** | २,१०० | ९८,१७४ | ४९० | ६,९५६ |
| **एकूण** | **१९,०५३** | **१०,९७,३३७** | **८,४९७** | **२,६२,६३१** |

*आधार:उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन २०१५*

# विशेष आर्थिक क्षेत्रे ६९.... कार्यान्वित फक्त २५

राज्याने फेब्रुवारी २००६ पासून विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) धोरण स्वीकारले असून ऑक्टोबर २०१५ पर्यंत राज्यात २४१ विशेष आर्थिक क्षेत्रांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. राज्यामध्ये ३१ ऑक्टोबर, २०१५ पर्यंत ७० विशेष आर्थिक क्षेत्रांची अधिसूचना रद्द झाली किंवा मागे घेण्यात आली आता ६९ मंजूर असून फक्त २५ कार्यान्वित आहेत. मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्र याबाबतची माहिती खालील तक्त्यामध्ये देण्यात आली आहे.

## मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रे

तक्ता क्र. ५ (ऑक्टोबर २०१५ पर्यंत)

| विभाग | विशेष आर्थिक क्षेत्रांची संख्या | | | क्षेत्र ( हेक्टर) | | | रोजगार (लाख) | | | गुंतवणूक ( रुपये कोटी ) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित |
| कोकण | ३१ | २२ | ६ | ८,९७७ | २,५१७ | २६१ | १४.८५ | ८.२२ | १.६४ | ४९,५५७ | ३३,८६८ | ७,३६६ |
| पुणे | २२ | १९ | १४ | ७९७ | ७६७ | ७२४ | ७.६१ | ७.०८ | १.७८ | ३५,१३१ | ३४,४२६ | १२,७०२ |
| नाशिक | २ | १ | ० | १,१०७ | १,००७ | ० | १.७५ | १.२५ | ० | १,८४३ | १, ३८० | ० |
| औरंगाबाद | ६ | ५ | २ | ५७६ | ४७४ | २२५ | ०.६३ | ०.२३ | ०.१६ | १, ७७४ | १, २७५ | ४,२५२ |
| अमरावती | २ | १ | १ | २०० | १५० | १५० | ०.४५ | ०.०५ | ० | ८०० | ३०० | २३५ |
| नागपूर | ६ | ४ | २ | २, ८५० | १, ७४० | १,६९९ | ५.४१ | ३.८७ | ०.०१ | ८, ५१९ | ३,८७१ | ७,७०० |
| **एकूण** | **६९** | **५२** | **२५** | **१४,५०७** | **६, ६५५** | **३, ०५९** | **३०.७०** | **२०.७०** | **३.५९** | **९७,६२४** | **७५,१२०** | **३२,२५५** |

*आधार: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१५*

## विदर्भ व मराठवाडा उपेक्षितच

सहकारी औद्योगिक वसाहतींची अवस्थाही बिकट आहे. १४२ पैकी फक्त १०२ कार्यरत आहे. कार्यरत नसलेल्या ४० सहकारी औद्योगिक वसाहती मराठवाडा व विदर्भातील आहेत. मराठवाड्यातील औरंगाबादमध्ये २६ पैकी १३ कार्यरत नाहीत, तर विदर्भातील अमरावती व नागपूर मध्ये २० पैकी १३ कार्यरत नाहीत. कृषी क्षेत्राप्रमाणे उद्योग व सेवा क्षेत्रातही मराठवाडा व विदर्भ उपेक्षित असल्याचे दिसून येते.

## सहकारी औद्योगिक वसाहतींची स्थिती

तक्ता क्र. ६ (नोव्हेंबर २०१५ पर्यंत)

| विभाग | मंजूर | कार्यरत | कार्यरत नसलेले | कार्यरत उद्योग घटक | भाग भांडवल ( रुपये कोटी) | रोजगार |
|---|---|---|---|---|---|---|
| बृहन्मुंबई | ४ | ३ | १ | ४७९ | नगण्य | २४,४०० |
| कोकण (बृहन्मुंबई वगळून) | १४ | १२ | २ | ६०२ | १.०१ | १२,८८८ |
| नाशिक | ३३ | २९ | ४ | २,१०९ | ४.९२ | ३८,५७३ |
| पुणे | ४५ | ३८ | ७ | ३,३२१ | ७.८७ | ७७,९७८ |
| औरंगाबाद | २६ | १३ | १३ | ६३१ | १.०३ | ५,९४६ |
| अमरावती | १० | ३ | ७ | १६१ | ०.०३ | ५९९ |
| नागपूर | १० | ४ | ६ | ४४२ | ०.९७ | ३,९४० |
| **महाराष्ट्र** | **१४२** | **१०२** | **४०** | **७, ७४५** | **१५.८३** | **१,६४,३२४** |

*आधार: महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०१५*

## शासकीय परिवहन सेवेची खाजगीकरणाकडे वाटचाल:

राज्यातील रस्त्यांवरील वाहनांची १ जानेवारी २०१६ रोजी एकूण संख्या २७१ लाख होती ( दर लाख लोकसंख्येमागे २३,००९ वाहने आणि दर किमी रस्त्याला ९० वाहने). सन २०१५ मध्ये एकूण अपघातांची व अपघातात मृत झालेल्या व्यक्तींची संख्या अनुक्रमे ६३,८०५ व १३,२१२ होती.

सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक व्यवस्था हे शहरातील वाहतुकीचे प्रमुख साधन आहे. राज्यातील २२ शहरात ही सुविधा उपलब्ध आहे. यापैकी सात शहरात (औरंगाबाद, नांदेड, नाशिक, सांगली-मिरज, रत्नागिरी, चंद्रपूर आणि वसई-विरार-नालासोपारा) मरामाप महामंडळ ही वाहतूक सेवा पुरविते. बृहन्मुंबई बेस्ट, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर परिवहन महामंडळ आणि उर्वरित १३ शहरांत संबंधित नगरपरिषद/महानगरपालिका वाहतूक सेवा पुरवितात. शहरी सार्वजनिक वाहतूक विषयक आकडेवारी खालील तक्त्यामध्ये दिली आहे.

### शहरी सार्वजनिक वाहतूक विषयक आकडेवारी

तक्ता क्र. ७

| वाहतूक सेवा पुरविणारी संस्था | मार्गस्थ बसेसची प्रतिदिन सरासरी संख्या | | प्रतिदिन सरासरी प्रवासी वाहतूक (लाख) | | प्रतिदिन सरासरी सार्थ वाहतूक (लाख किमी) | | निव्वळ नफा/तोटा (रुपये लाख) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५ | २०१४ | २०१५ | २०१४ | २०१५ | २०१४ | २०१५ |
| बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) | ३,७५३ | ३,६३६ | ३५.८० | ३३.४७ | ६.९९ | ६.६८ | -५९,०३८ | -८५,८०२ |
| पुणे माहनगर परिवहन महामंडळ | १,२९५ | १,३६४ | ११.६४ | १२.१७ | ३.०० | ३.१४ | -९,९४१ | -१६,७६९ |
| मरामाप महामंडळ (शहर वाहतूक) | ४९७ | ४८२ | ३.०३ | २.४४ | ०.९७ | ०.९१ | -२,३९७ | -२,६८८ |
| नागपूर महानगरपालिका परिवहन | २४० | २४० | १.३१ | १.३५ | ०.४५ | ०.४२ | -२,४८८ | -२,५३४ |
| नवी मुंबई महानगरपालिका परिवहन | २२२ | २४३ | २.०४ | २.१९ | ०.६३ | ०.६७ | -२,१३२ | -३,२०९ |
| ठाणे महानगरपालिका परिवहन | १८९ | १७४ | २.०१ | १.७१ | ०.३९ | ०.३४ | -२,७३३ | -३,७९६ |
| कोल्हापूर महानगरपालिका परिवहन | १२० | ९२ | ०.९८ | ०.७१ | ०.२९ | ०.२१ | -८६ | उपलब्ध नाही |
| वसई-विरार महानगरपालिका परिवहन | १०५ | ११० | ०.९४ | ०.९६ | ०.२१ | ०.२२ | -१७७ | -३९६ |
| कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन | ७१ | ७५ | ०.४६ | ०.४० | ०.१३ | ०.१३ | -५०७ | -१,७६४ |
| सोलापूर महानगरपालिका परिवहन | ६७ | ६९ | ०.४५ | ०.४८ | ०.१५ | ०.१६ | -७६७ | -३७८ |
| मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन | ४७ | ३९ | ०.४८ | ०.२४ | ०.११ | ०.०९ | -४० | -२१६ |
| अमरावती महानगरपालिका परिवहन | ३३ | ३३ | ०.०३ | ०.०३ | ०.०८ | ०.०८ | ७ | ७ |
| अहमदनगर महनगरपालिका परिवहन | - | १८ | - | ०.११ | - | ०.०२ | - | -७२ |
| खोपोली नगरपालिका परिवहन | २१ | १७ | ०.१७ | ०.१७ | ०.०३ | ०.०३ | - नगण्य | - नगण्य |
| जळगाव महानगरपालिका परिवहन | १० | ५ | ०.०३ | ०.०१ | ०.०२ | ०.०१ | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही |
| अकोला महानगरपालिका परिवहन | १० | + | ०.०७ | + | ०.०२ | + | -२८ | + |

+ २०१५-१६ पासून वाहतूक सेवा बंद

*आधार: बेस्ट, संबंधित नगरपालिका, महानगरपालिका, पुणे महानगर परिवहन महामंडळ व मरामाप महामंडळ*

- **शासकीय परिवहन सेवा जाणीवपूर्वक मोडीत काढायची शासनाची योजना दिसतेय. तेजस्विनी बसेसची घोषणा करताना राज्यातील परिवहन सेवा व शहरातील परिवहन सेवा मजबूत सक्षमीकरण करण्याबाबत शासन उदासिन दिसतेय. एकीकडे शासकीय परिवहन सेवा भरीव तरतूद न करता मोडीत काढणे व दुसरीकडे प्रतिवर्ष ८०० कोटी टोलमाफी. यावरुन परिवहन सेवेबाबत शासनाचे खाजगीकरणाकडे जाण्याचे धोरण स्पष्ट होते.**

# ''घोषणा मोठ्या, कृती शून्य''

## ७ वर्षात महाराष्ट्रात १९ लाख घरे कशी बांधणार?

मुंबई तसेच राज्याच्या काही भागात घरे उपलब्ध करून देण्याकरिता म्हाडाची स्थापना सन १९७७ मध्ये करण्यात आली. स्थापनेपासून डिसेंबर २०१५ पर्यंत म्हाडाने एकूण ४,५०,००० सदनिकांचे बांधकाम व पुनर्विकास केला आहे.

फेब्रुवारी २०१५ मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण धोरणाबाबत चर्चा सुरू झाली. मात्र आजही हे धोरण प्रलंबित आहे. नवीन गृहनिर्माण धोरण अमलात येत नाही तोपर्यंत शासन कोणते गृहनिर्माण धोरण अंमलात आणीत आहे? त्यातच शासनाने अनधिकृत बांधकामांना अधिकृत करण्याचे आदेश दिले. अनधिकृत बांधकामांना मान्यता देण्याचे आदेश कोणत्या धोरणानुसार आहेत?

पंतप्रधान आवास योजना दिनांक १७.०६.२०१५ रोजी सुरु झाली असून ती ३१.०३.२०२२ पर्यंत सुरू राहील असे सांगण्यात येत आहे. ह्या ७ वर्षामध्ये राज्यात १९ लाख तर मुंबई मनपा क्षेत्रात ११ लाख घर बांधण्याचा संकल्प आहे. हा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येक वर्षी किमान ३ लाख घरे निर्माण करावी लागतील. महाराष्ट्र मंत्रिमंडळात असा निर्णय घेण्यात आला होता की झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) योजना ज्या शहरांमध्ये सुरू असेल तेथे प्रधानमंत्री आवास योजना लागू केली जाणार नाही.

एसआरए योजना ही रेल्वे आणि केंद्र शासनाच्या जागांवर असलेल्या झोपड्यांना लागू होत नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्र शासन मुंबई शहर झोपडपट्टी मुक्त कसे करु शकेल? सर्वांना घरे कसे देणार? मुंबई मध्ये ११ लाख घरे व एकूण राज्यातील १९ लाख घरे कसे देणार? त्यासाठीचे नियोजन व रोड मॅप काय? आदिवासी पाडे, कोळीवाडे, गावठाणातील घरे याबाबत राज्य शासनाची भूमिका काय?

### म्हाडाकडून २०११ ते २०१६ दरम्यान बांधण्यात आलेल्या सदनिका व मालकीचे भूखंड

तक्ता क्र. ८ (संख्या)

| वर्ष | आर्थिक दुर्बल गट | अल्प उत्पन्न गट | मध्य उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | इतर | | एकूण सदनिका $ | भूखंडाची संख्या | खर्च @ (रुपये कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सदनिका | संक्रमण शिबिरे | | | |
| २०११-१२ | ८१५ | २,९४१ | २३८ | ३८८ | १२२ | - | ४,५०४ | ७९४ | ९२८.९४ |
| २०१२-१३ | १२४ | १,२९८ | ३१८ | १९७ | ३७८ | - | २,३१५ | २२४ | ४६५.४५ |
| २०१३-१४ | १,५४२ | ४,६२७ | ६८७ | ४६९ | ९९ | ३५६ | ७,४२४ | ४३३ | ८५०.४२ |
| २०१४-१५ | ९१५ | १,१३६ | १,२९० | १९६ | ७१ | ८५५ | ३,६०८ | - | ४२४.३८+ |
| २०१५-१६ | ३३९ | १८२ | २५१ | - | - | - | ७७२ | - | ४८८.३१ |

*आधार: म्हाडा, मुंबई* *+ डिसेंबर पर्यंत @ भूखंडासह $ संक्रमण शिबिरे वगळून*

## बेघरांसाठी उपलब्ध ७० कोटी निधी न वापरता पडून

राष्ट्रीय शहरी रोजगार अभियान हे २०१४ मध्ये सुरू करण्यात आले. त्यामध्ये शहरी बेघरांसाठी निवारे बांधण्यासाठी योजना मांडण्यात आली. २०१४-२०१५ मध्ये सदर अभियान अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडे १२८ कोटी ५३ लाख ८६ हजार रुपये देण्यात आले. त्यातील १२४ कोटी ७३ लाख ३९ हजार रुपये राज्य शासनाने अभियानाच्या अंमलबजावणीसाठी नगरपरिषद संचनालय यांना वितरीत केले. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सुमारे ७० कोटी रुपये निधी शिल्लक होता.त्या संदर्भात केंद्र शासनाने हा शिल्लक निधी राष्ट्रीय शहरी रोजगार योजनेअंतर्गत बेघरासाठी निवारे बांधण्यासाठी वापरण्याची मान्यता दिली. माहितीच्या अधिकारानुसार मिळालेल्या माहितीमध्ये असे स्पष्ट होते की, मुंबई महानगरपालिकेकडे अजून ७० कोटी रुपये पडून आहेत. बेघर निवाऱ्यांसाठी नागरी बेघर निवारा योजनेअंतर्गत खर्च करण्यात आलेले नाहीत.

मा. सुप्रीम कोर्टाने २०१० रोजी दिलेल्या निर्देशानुसार सर्व महत्वाच्या शहरांमध्ये जेथे पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या आहे तेथे एक लाख लोकसंख्येमागे एक असे रात्र निवारे बांधावेत असे नमूद करण्यात आले.२०१४ मध्ये राष्ट्रीय शहरी  रोजगार अभियानामार्फत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक १०० बेघर व्यक्तीमागे १ निवास असावा. २०११ च्या जनगणने नुसार एकट्या मुंबईत सध्या ५७,४१६ बेघर नागरीक आहेत. शहरी बेघरांसाठी निवारे या योजनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे मुंबईत ५७४ बेघर निवाऱ्यांची गरज आहे. परंतु सद्यस्थितीत मुंबईत केवळ ७ निवारे दिसून येतात व राज्यातील इतर भागात बेघरांसाठी निवाऱ्यांची व्यवस्थाच नाही आहे. शहरी गरिबांच्या गरिबीचे उच्चाटन होण्यासाठी सुरू करण्यात आलेली राष्ट्रीय शहरी रोजगार अभियानातील बेघरांसाठी निवारे ही योजना अजूनही कागदावर आहे असे दिसून येते.

## ''दलित, आदिवासी, श्रमिक वसाहतींना पाणी पुरवठा नाकारला''<br>शासन करतेय मुंबई उच्च न्यायालयाचा  व संविधानाचा अवमान:

मुंबई हायकोर्टाने आपल्या आदेशात लोकवसाहतीत राहणाऱ्या श्रमिकांच्या मूलभूत अधिकाऱ्यांचे संवर्धन करत सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य शासनास स्पष्ट केले की , लोक वसाहतीत असणारी घरे जरी अनधिकृत असली तरी त्यातील निवासी नागरिकांना पाण्याची जोडणी मिळणे अत्यावश्यक आहे. पाणी व जगण्याच्या महत्वाच्या संबंधाला अधिक मजबुतीने मांडणी करण्यात आली की, पाण्याचा हक्क हा जगण्याचा मूलभूत हक्क आहे. सर्वांना पाणी उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यानुसार न्यायालयाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्था विशेषत बृहन्मुंबई महानगरपालिकेला फेब्रुवारी २०१५ च्या आत पाणी पुरवठा धोरणाचा प्रस्ताव देण्याचे आदेश दिले.माननीय न्यायालयाचे आदेश असूनही व कोर्टात राज्य सरकारने सर्वांना पाणी देण्यासाठी मान्य केलेले असताना देखील मुंबई महानगर पालिकेने परिपत्रक काढून पाणी देण्याचे नाकारले यामुळे तब्बल १५ लाख मुंबईकरांना कायदेशीर पाणीपुरवठा न मिळाल्यामुळे पाणी माफियांवर अवलंबून रहावे लागत आहे. या पाणी माफियांकडून वाजवी दरापेक्षा शेकडो पटीने जास्त किमतीत पाणी विकत घ्यावे लागते. ह्या निर्णयामुळे महानगरपालिकेच्या महसूलात ही तोटा निर्माण होत असून यामध्ये दलित, आदिवासी, गरीब-श्रमिक जनतेची आर्थिक पिळवणूक देखील होत आहे.

## महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) गुंडाळले बासनात

महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान या योजनेमधील लाभार्थी अधिकृत/अनधिकृत वसाहतीमध्ये राहत असतील अथवा अधिसूचित केलेल्या / अधिसूचित न केलेल्या झोपडपट्टीमध्ये राहत असतील तरी त्यांना वैयक्तिक/ घरगुती / सामुदायिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.या अभियानांतर्गत बांधण्यात येणारी वैयक्तिक घरगुती शौचालय पाणीपुरवठ्याच्या सुविधेसह बांधण्यात येतील याबाबत सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी काळजी घ्यावी.

शासन निर्णयात उपरोक्त स्पष्टपणे नमूद केलेले असताना देखील, मुंबई महानगरपालिकेने या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी काढलेल्या परिपत्रकामध्ये या योजनेच्या अंमलबजावणीची पायमल्ली केलेली दिसून येते. सदर परिपत्रकामध्ये १.१.२००० नंतरच्या झोपड्यांना तसेच केंद्र शासनाच्या जमिनीवर असणाऱ्या, रेल्वे आणि पोर्ट ट्रस्ट जमिनीवरील झोपड्यांना, पदपथावरील लोक वसाहतींना, बेघर नागरिकांना या योजनेचा लाभ नाकारण्यात येत आहे.

## गुड गर्व्हनन्सचे काय झाले?

महाराष्ट्र शासनाने १३ जुलै २००९ रोजी महानगरपालिका कायद्यांमध्ये सुधारणा केली. ( २००९ ची २१ वी सुधारणा) या अन्वये नगरसेवकाच्या प्रभागाच्या पातळीवर क्षेत्र सभांची (एझ्श्) निर्मिती करणे आणि या क्षेत्र सभांना कृतशील होण्यासाठी आवश्यक संसाधने आणि सहाय्य पुरविणे आवश्यक होते. आज पर्यंत या सुधारणेची अंमलबजावणी करण्याचे आदेश नगरविकास विभाग यांच्याकडून दिले गेलेले नाहीत. लोक सहभागाने शासकीय व्यवहारात पारदर्शकता येऊन शासनाचे उत्तरदायित्व वाढते. यातूनच लोकशाहीला बळकट होण्याची प्रक्रिया होत असते मात्र शासनाने या सुधारणांच्या अंमलबजावणीकडे पूर्णत: दुर्लक्ष केलेले आहे.

## कोळीवाडे आणि आदिवासी पाड्यांचे सीमांकन समिती कागदावर

मुंबई प्रस्तावित विकास आराखड्यात (२०१४-३४) प्रस्तावित जमीन वापर नकाशात गावठाण, कोळीवाडे आणि आदिवासी पाड्यांना शहरी गाव या नावाने सीमा दर्शविण्यात आलेल्या नव्हत्या. मुंबईत २२२ आदिवासी पाडे आहे तर त्यातील २७ आदिवासी पाडे हे आरे कॉलनीत येत आहेत. सदर २७ आदिवासी पाडे हे या विकास आराखड्यात दाखविण्यात आलेले नव्हते.

राज्य महसूल विभागाने या वसाहतींच्या सीमा दर्शविण्यासाठी समिती स्थापन केली होती, परंतु आजतागायत त्यांची सीमा निश्चित करण्यात आलेली नाही. तसेच मुंबईच्या नविन कोस्टल झोन मेनेजमेंट प्लेन हा कोस्टल झोन नियमन सूचना २०११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निश्चित करणे गरजेचे आहे. मुंबईसारख्या सागरी किनाऱ्यालगत असणाऱ्या शहराचा विकास आराखडा हा कोस्टल झोन मेनेजमेंट प्लान मंजूर व निश्चित झाल्याशिवाय कसा पूर्ण होऊ शकतो? मुंबईचा विकास आराखडा पुन्हा सूचना व हरकतीसाठी प्रदर्शित केला जाईल आणि या शहरी गावांचे भवितव्य मात्र बांधकाम व्यावसायिकांच्या दयेवर अवलंबून राहील.

# आज मुंबई पुणे तर,उद्या सर्वच शहरांपुढे कचऱ्याचा प्रश्न

मुंबईत दररोज सुमारे ७.५ हजार टन (७५ लाख किलो) कचरा निर्माण होती! मुंबई द्वीपाचा पृष्ठभाग आहे ४५० चौरस किलोमीटर तर लोकसंख्या एक कोटीपेक्षा जास्त. मुंबईतील कचरापट्ट्या ८-१० वर्षापूर्वीच भरून ओसंडून वाहू लागल्या आहेत. कचरा व्यवस्थापनाला घरघर लागून इतका काळ लोटला आहे की सर्वसामान्यांच्या मनात या प्रश्नांविषयी निराशा भरून राहिली आहे. आता धुरामुळे राहवत नाही म्हणून कचऱ्याच्या संदर्भात आरडाओरड व निदर्शने दिसून येतात. देशाच्या आर्थिक राजधानीची प्रतिष्ठा कचऱ्यासह जळून खाक होते आहे व जनतेच्या मनात चिंतेच्या धुराचे ढग दाटले आहेत.

राज्यातील शहरामध्ये प्रतीदिवशी २६८२०.२१ मेट्रीक टन (कोटी किलो) कचरा निर्माण होतो व फक्त ५०३६ मेट्रीक टन कचऱ्यावर प्रक्रिया होते. म्हणजे फक्त २०% कचऱ्यावर प्रक्रिया होते. वरील आकडे फक्त स्थानिक स्वराज संस्थेद्वारे उचललेला जाणारा कचरा आहे. यापेक्षा कित्येक पट्टीने कचरा शहरात रस्तो-रस्ती पडलेला दिसून येतो. यावरून ही समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येते.

## राज्यातील सन २०१४-१५ मध्ये स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील घनकचरा निर्मिती व प्रक्रियेची माहिती

तक्ता क्र.९ *(प्रति दिवस मे. टन मध्ये)*

| स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | संख्या | महापालिका घन कचरा | |
|---|---|---|---|
| | | निर्मिती | प्रक्रिया |
| महानगरपालिका | २६ | २३,९२१.०० | ४,००२.०० |
| अ वर्ग नगरपालिका | १२ | ५५९.०० | १०९.०० |
| ब वर्ग नगरपालिका | ६१ | १,१०२.४६ | ३९६.७४ |
| क वर्ग नगरपालिका | १४६ | १ , १०६.३३ | ४३२.७६ |
| नगर पंचायत/ कटक मंडळे | १२ | १३१.५० | ९६.०० |
| **एकूण** | **२५७** | **२६,८२०.२९** | **५,०३६.५०** |

*आधार: महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ*

## भारतात १४ लाख जनता दरवर्षी प्रदूषणाने मरतात, तर आजारी होण्याचे प्रमाण १०० पटीने जास्त

हवेमध्ये हानीकारक वायू, धुलिकण, दुर्गंधीयुक्त वायू जेव्हा प्रमाणाबाहेर असतात तेव्हा वायू प्रदूषण होते. वायू प्रदूषण प्रतिबंधित, नियंत्रित व कमी करण्यासाठी वायू (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१ अधिनियमित करण्यात आला आहे. राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या वायू गुणवत्ता संनियंत्रण स्थानकांपैकी ८ अविरत, ७१ राष्ट्रीय आणि ४ राज्य वायू गुणवत्ता संनियंत्रण स्थानके आहेत. वायू प्रदूषण नियंत्रित ठेवण्यासाठी कमी गंधक असलेले डिझेल, शिसेरहीत पेट्रोल, सीएनजी/एलपीजी या पर्यायी इंधनाचा वापर करणे, पीयुसी अनिवार्य करणे, १५ वर्षे झालेल्या वाहनांवर बंदी घालणे अशा उपाययोजनाची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील सर्वच शहरांनी धोक्याची पातळी गाठली आहे. नायट्रोजन ऑक्साईड व अधांतरी दूषित कणासारखे घातक वायूची पातळी चिंताजनक आहे.

## प्रमुख संनियंत्रण स्थानकांनी नोंदविलेल्या परिसर वायू गुणवत्ता

तक्ता क्र. १०

| वायू प्रदूषित करणाऱ्या पदार्थांची तीव्रता | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सल्फर डायऑक्साईड (मर्यादा ५०) | | | नायट्रोजन ऑक्साईड (मर्यादा ४०) | | | अधांतरी दूषित कण (मर्यादा ६०) | | |
| स्थानक | किमान | कमाल | सरासरी | किमान | कमाल | सरासरी | किमान | कमाल | सरासरी |
| मुंबई | १ | ४१ | १३ | ११ | १८९ | ८७ | २३ | ३७९ | १३१ |
| (सायन) | (२) | (८६) | (१०) | (५) | (२०८) | (९३) | (३६) | (३९०) | (१२९) |
| पुणे | ६ | ५५ | २२ | १३ | १६७ | ६७ | १८ | २८६ | १०१ |
| (स्वारगेट) | (१२) | (५१) | (२३) | (१६) | (१०५) | (४५) | (८) | (२६८) | (७९) |
| नाशिक | ३ | २९ | १६ | ९ | ४८ | २३ | २२ | ३५९ | ८२ |
| (नवीन मनपा इमारत) | (५) | (३४) | (२५) | (१६) | (४६) | (२७) | (३४) | (१३८) | (७३) |
| औरंगाबाद | ९ | १८ | १२ | ३४ | ५७ | ४१ | २१ | १६१ | ६८ |
| (कडा कार्यालय) | (७) | (३७) | (१२) | (२६) | (७७) | (३९) | (१५) | (१५३) | (७७) |
| अमरावती | ५ | १४ | ११ | ६ | १५ | १३ | ३८ | ९७ | ७४ |
| (शास.अभि.महाविद्या.) | (५) | (१४) | (११) | (६) | (१६) | (१२) | (४२) | (१०८) | (७७) |
| नागपूर | ६ | ४२ | ९ | १६ | ६२ | २९ | ३६ | १४४ | ५५ |
| (मप्रनिमं यांचे प्रादेशिक कार्यालय) | (७) | (१४) | (९) | (१६) | (४५) | (२६) | (२७) | (११७) | (६४) |

*आधार: महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ २०१५*

- **मुंबई, पुणे व औरंगाबाद शहरांनी नायट्रोजन औक्साईड व अधांतरी दूषित कण प्रदूषणाची मर्यादा ओलांडली आहे तर नाशिक, अमरावती व नागपूर या शहरांनी अधांतरी दूषित कण प्रदूषणाची मर्यादा ओलांडली आहे. शासनाने वेळीच सकारात्मक पाऊल उचलणे आवश्यक आहे.**

# राज्यात अग्निशामक यंत्रणेची वानवा

महाराष्ट्र राज्यात राज्य स्तरीय अग्निशमन सेवा उपलब्ध नाहीत आणि अग्निशमनाचे काम प्रामुख्याने नागरी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती तसेच विशेष नियोजन प्राधिकरणे उदा. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिडको इत्यादी मार्फत केले जाते. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार कौन्सिलच्या शिफारशीनुसार राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती यांच्या अग्निशमन सेवेतील त्रुटींचा आढावा या कार्यालयाने घेतला असून त्यानुसार अत्यल्प महानगरपालिका वगळता सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अग्निशमन सेवेत मोठी तूट आहे. ३५० स्थानिक स्वराज्य संस्थेपैकी तब्बल १०६ स्थानिक स्वराज्य संस्थांकडे अग्निशमन सेवा उपलब्धच नाही. उरलेल्या सेवा फारच त्रोटक आहेत. १० कि.मी. मध्ये १ केंद्र आवश्यक असताना राज्यातील एकाही शहरात नाही. महाराष्ट्रातील ज्या महानगरपालिका / नगरपरिषदा यांचेकडे अग्निशमन सेवा आहेत/ नाहीत त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | एकूण | अग्निशमन सेवा | |
|---|---|---|---|---|
| | | | आहेत | नाहीत |
| १ | अ +वर्ग महानगरपालिका | १ | १ | ० |
| २ | अ-वर्ग महानगरपालिका | २ | २ | ० |
| ३ | ब- वर्ग महानगरपालिका | ३ | ३ | ० |
| ४ | क-वर्ग महानगरपालिका | ४ | ४ | ० |
| ५ | ड-वर्ग महानगरपालिका | १६ | १६ | ० |
| ६ | अ-वर्ग नगरपरिषदा | १२ | १२ | ० |
| ७ | ब-वर्ग नगरपरिषदा | ६१ | ६१ | ० |
| ८ | क-वर्ग नगरपरिषदा | १५६ | १४२ | १४ |
| ९ | नगरपंचायती | ९५ | ३ | ९२ |
| **एकूण** | | **३५०** | **२४४** | **१०६** |

*आधार: शासन निर्णय २०११*

- **नियोजन, काटेकोर अंमलबजावणी व समन्वयाचा अभाव यामुळे राज्यांतील शहरांपुढील समस्या वाढत आहेत, पाणी, वीज, मूलभूत सेवा-सुविधा सोबत प्रदूषण, घनव्यवस्थापन, परिवहन, अग्निशामक यंत्रणा आदि बाबतीत शासन निर्णय घेण्यात कमी पडत आहे. देशातील इतर राज्य महाराष्ट्रापेक्षा वेगाने प्रगती करीत असताना राज्याने त्वरित योग्य नियोजनाद्वारे राज्याचा विकास साधला पाहिजे.**